# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष-२ ■ अंक-३६ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १० एप्रिल २०२३ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


# नेहमी घोषणा का करता? दिवा शहरात तातडीने हॉस्पिटल सुरू करावे, अशी पालिका प्रशासनाची इच्छा नाही का?

## हक्काचे हॉस्पिटल घेतल्याशिवाय आमचा लढा थांबणार नाही!

### भाजपच्या दिवा शहर महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांचा निर्धार



**जागेचा प्रश्न सुटत नसेल तर दिवा पश्चिमेला पालिकेच्या इमारतीत तात्पुरते रुग्णालय करा,पण जनतेला आरोग्य सुविधा द्या**
**- ज्योती पाटील**

**माजी उपमहापौर ५ वर्षापूर्वीची घोषणा आता पुन्हा करून लोकांना का फसवत आहेत,निवडणूक जवळ आली आहे म्हणून का?नवे रुग्णालय जमत नसेल तर किमान तात्पुरते हॉस्पिटल तरी उभारा..**

**हॉस्पिटल होणार सांगतात... अरे पण कधी?१० वर्षांनंतर?काय चालले आहे दिव्यात.येथील महिला,सामान्य जनता यांच्या आरोग्याची तुम्हाला काळजी नाही आणि विकासाच्या गप्पा कसल्या मारता?**
**ज्योती पाटील यांचा संतप्त सवाल**

▶ विशेष प्रतिनिधी

**दिवा:-ज्योती पाटील या दिवा शहरात पालिकेचे रुग्णालय व्हावे यासाठी आंदोलन करत आहेत.सध्याच्या घडीला जागेचा प्रश्न सुटत नसेल, तर पालिकेच्या दिवा पश्चिमेला उपलब्ध इमारतीमध्ये तातडीने रुग्णालय सुरू करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.दिव्यात राजकीय नेतृत्व करणारे माजी उपमहापौर येथील जनतेला गृहीत धरतात असा आरोप ज्योती पाटील यांनी केला आहे.याबाबत त्यांनी आपली रोखठोक मते मांडली आहेत.**

दिव्याला गेली अनेक वर्षे आरोग्य सुविधांपासून वंचित ठेवले गेले आहे.मागील ५ वर्षात एक सार्वजनिक रुग्णालय हे सुरू करू शकले नाही.येथील जनता टॅक्स भरते,येथील जनतेकडून अव्वाच्या सव्वा पाणीपट्टी वसूल केली जाते.येथील रस्त्यावर फेरीवाले बसवून रस्त्यांची वाट लावली जाते.दिव्याला अक्षरशः ओरबडले जाते,मात्र तरीही येथील ५ लाख लोकसंख्येच्या दिव्याला साधं एक हॉस्पिटल पालिका देऊ शकत नाही असा संताप भाजपच्या महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी व्यक्त केला आहे.

येथील महिला भगिनींना गरोदरपणा मध्ये उपचारासाठी डोंबिवली ठाणे, मुंबई येथे जावे लागते.महागडे उपचार सर्वसामान्य लोकांना परवडत नाहीत. एखादा माणूस इमर्जन्सी मध्ये आजारी पडला तर त्याला ठाणे मुंबई येथे नेई पर्यंत वाटेत त्याचा जीव ज्याण्याचा धोका असतो.पहिले तर एक तास त्या आजारी पेशंटच्या नातेवाईकांचा ॲम्ब्युलन्स शोधण्यात जातो... दिव्यातील गोरगरीब जनतेच्या आरोग्याचा गांभीर्याने विचार पालिका प्रशासन कधी करणार असा संतप्त सवाल ज्योती राजकांत पाटील यांनी दिवा न्यूजशी बोलताना केला आहे. ज्योती पाटील यांनी पालिकेच्या धोरणावरच ताशेरे ओढले असून जागेची समस्या असेल तर पालिकेची जी इमारत दिवा पश्चिमेला आहे तिथे तात्पुरते रुग्णालय का उभारले जात नाही?तुम्ही सांगता आगासनला रुग्णालय होणार आहे...कधी ५ वर्षांनंतर? अहो तीच बातमी तुम्ही २०१८ ला छापून आणली होती. आता पुन्हा ५ वर्षांनंतर ती बातमी छापली. लोकांना किती मूर्ख बनवाल?असा सवाल ज्योती पाटील यांनी केला आहे. जोपर्यंत नागरिकांना दिव्यात पालिकेचे रुग्णालय मिळत नाही तोपर्यंत आम्ही थांबणार नाही असा निर्धार ज्योती पाटील यांनी केला आहे.दिव्यातील जनतेला गृहीत धरण्याचे प्रकार आता बंद करावेत,जनतेला आरोग्य सुविधा देणे हे पालिकेचे कर्तव्य आहे. सार्वजनिक हॉस्पिटल हा आमचा हक्क आहे असेही ज्योती पाटील यांनी ठणकावून सांगितले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, १० एप्रिल २०२३


# मुंब्र्यात इमारतीच्या पहिला मजल्यावरील गॅलरीचा स्लॅब पडला

## घरात अडकलेल्या शंभर वर्षीय आजीबाईंची सुखरूप सुटका




**ठाणे:** मुंब्रा, पडलेकर वाडी येथे तळ अधिक एक मजली असलेल्या राणा निवास लोडबेरिंग चाळीतील पहिल्या मजल्यावरील गॅलरी पडल्याची घटना गुरुवारी दुपारी एक ते सव्वा एक वाजण्याच्या सुमारास घडली. यावेळी घरामध्ये अडकलेल्या शंभर वर्षीय लक्ष्मी मंचेकर या आजीबाईंचा सुखरूप सुटका करण्यात अग्निशमन दलाच्या जवानांसह आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांना यश आले आहे. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. तर घटनास्थळी चाळीचा उर्वरित भागही धोकादायक स्थितीत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने धोकापट्टी लावण्यात आली आहे.

२० ते २५ वर्षे जुन्या चाळीच्या पहिल्या मजल्याची गॅलरी पडली असून एक महिला अडकल्याची माहिती मिळताच घटनास्थळी मुंब्रा प्रभाग समिती सहाय्यक , अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, बांधकाम विभागाचे कर्मचारी, टोरंट पॉवर कंपनीचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान यांनी तातडीने धाव घेतली आणि अडकलेल्या शंभर वर्षीय आजीबाईंची सुखरूप सुटका केली. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. या चाळीत तळ आणि पहिल्या मजल्यावरती प्रत्येकी ४-४ सदनिका आहेत. सद्यस्थितीत ते ८ कुटुंब वास्तव्यास असून गॅलरी पडली ती खोली आणि त्याच्या खालील खोली रिकामी करण्यात आली असून चाळीचा उर्वरित भागही धोकादायक स्थितीत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने धोकापट्टी लावण्यात आली आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## रस्त्यावर सांडलेल्या तेलावरून दुचाकी घसून दुचाकीस्वार जखमी; डाव्या पायाला झाली दुखापत

**ठाणे:** शहरात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने रस्त्यावर अनोळखी वाहनांमधून तेल सांडण्याचे प्रकार वाढले आहेत.अशाप्रकारे गुरुवारी सकाळी नवीन कळवा उड्डाणपूलावरील रस्त्यावर सांडलेल्या तेलावरून दुचाकीस्वार ऋषिकेश गाडेकर (२४) हा तरुण घसून जखमी झाला आहे. त्याच्या डाव्या पायाला दुखापत झाली असून त्याला जवळील रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

कळवा खाडीवरील तिसरा आणि नवीन उड्डाणपूलावरील राबोडी कडून विटावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास एका अनोळखी वाहनातून तेल सांडले होते. याचदरम्यान नौपाड्यातील जखमी ऋषिकेश हा तरुण काही कामानिमित्त आपल्या दुचाकीवरून जात होता. त्यावेळी सांडलेल्या तेलावरून त्याची दुचाकी घुसली आणि तो रस्त्यावर पडला. यावेळी त्याच्या डाव्या पायाला दुखापत झाली आहे.



**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# एन.टी.केळकर स्मृती आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ

## आमदार संजय केळकर, आणि सदांनद केळकर यांची प्रमुख उपस्थिती

**ठाणे:-** ठाण्याचा क्रिकेट, महाराष्ट्राचा आणि देशाचा क्रिकेट पुढे जायचा असेल. तर नवनवीन खेळाडू घडविण्यासाठी सराव आणि स्पर्धा पाहिजेत.आणि खेळाडूंना ती संधी मिळवून देण्याचे काम गेली ४७वर्षे स्टार्स स्पोर्टसच्या माध्यमातून मुंबई क्रिकेट असोसिएशन संलग्न एन.टी. केळकर स्मृती आंतरशालेय क्रिकेट अविरतपणे करीत आहेत.तर ठाणे महापालिकेच्या वतीने ३७वर्षे दादोजी कोंडदेव क्रीडा संकुलाच्या खेळपट्टीवर आणि अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खेळण्याची संधी उपस्थित ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंना मिळणे हे त्यांच्यासाठी भाग्य असल्याचे आमदार संजय केळकर म्हणाले.

कोव्हीड काळात खंड पडल्यानंतर आज ठाणे जिल्ह्यातील आंतरशालेय विद्यार्थांसाठी. गेली ४७वर्षे खेळली जाणारी स्टार स्पोर्ट्स क्लब आयोजित आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन संलग्न



एन.टी.केळकर स्मृती आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन सदानंद केळकर, आमदार संजय केळकर यांच्या हस्ते आज दादोजी कोंडदेव क्रीडा संकुल येथे करण्यात आले.यावेळी सेंट्रल मैदान क्रिकेट क्लब अध्यक्ष डॉ राजेश मढवी, डोंबिवली क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष एम.डी.मराठे, सचिव बाळा खोपकर, ठामपा क्रीडा उपायुक्त मिनल पालांडे आदी उपस्थित होते. यंदा टुर्नामेंटला विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहे त्यामुळे थोडा उशीर झाला असल्याचे सांगितले. जवळपास २५ते३० संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत .आजचा पहिला सामना सिंघानिया स्कूल विरूद्ध सरस्वती शाळा असा रंगणार असून टॉस जिंकण्याचा पहिला मान सरस्वती शाळा या क्रिकेट संघास मिळाला. साधारणपणे महिनाभर चालणाऱ्या या टुर्नामेंटच्या बक्षीस वितरण समारंभाच्या दिवशी मुंबई क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष काळे उपस्थित राहणार असून या माध्यमातून अंजिक्य रहाणे सारखे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जाचे खेळाडू तयार झाले आहेत.

आतापर्यंत ७५० खेळाडू या स्पर्धेतून तयार झाले असल्याचे आमदार केळकर म्हणाले. तर मध्यंतरी अंजिक्य रहाणे याने, आपले क्रिकेट विश्वातील भविष्य घडविण्यात या एन.टी. केळकर स्मृती आंतरशालेय क्रिकेट टुर्नामेंटचे मोठे योगदान असल्याचे बोलून दाखवले असेही केळकर म्हणाले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# दिवा पोलीस ठाण्यासाठी अद्याप जागाच उपलब्ध नाही,
# तर बांधकाम कुठून सुरू होणार?

***दिवा:– दिवा शहरासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकाम सुरू असल्याचे वृत सोशल मीडियावर व्हायरल झाले असून हे वृत्त दिशाभूल करणारे असल्याचे सांगत या वृत्ताचे खंडन मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोल्हटकर यांनी केलेआहे.***

दिवा शहरासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवलेला आहे. या ठिकाणी स्वतंत्र पोलीस स्टेशन व्हावे अशी अनेक वर्षांची नागरिकांची मागणी आहे. मात्र अद्याप सदर पोलीस स्टेशन साठी प्लॉटच उपलब्ध झालेला नसल्याने बांधकाम सुरू करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे अशा पद्धतीचं वृत्त हे नागरिकांची दिशाभूल करणारे असल्याचे मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कोल्हटकर यांनी सांगितले. मागील काही दिवसांपासून दिवा शहरात स्वतंत्र पोलीस ठाणे होण्याबाबतच्या चर्चा सुरू असून दिवा पोलीस ठाण्याच्या इमारतीचे बांधकाम सुरू झाले असल्याचे वृत्त सोशल मीडियावर प्रसिद्ध झाल्याने ही चर्चा वाढीस लागली. दिव्यासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याचे बांधकाम सुरू होऊन एक वर्षात हे स्टेशन सुरू होईल असे सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या वृत्तात सांगण्यात येत होते. मात्र सदर वृत्तच चुकीचे आणि दिशाभूल करणारे असल्याचे आता मुंब्रा पोलीस स्टेशन कडून स्पष्ट करण्यात आले आहे.

> *दिवा शहरासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याचा प्रस्ताव आम्ही शासनाकडे दिलेला आहे.मात्र अद्याप जागा उपलब्ध झालेले नाही, तर इमारतीचे बांधकाम कुठून सुरू होईल?दिव्यात पोलीस ठाण्याचे बांधकाम सुरू अशा पद्धतीने सोशल मीडियावर फिरणारी बातमी ही दिशाभूल करणारी आहे!*
>
> **– कोल्हटकर,**
> वरीष्ठ पोलीस निरीक्षक,
> मुंब्रा

# फुटलेल्या फळ्यावर सांगा कसे शिकायचे?

## दिव्यातील ठाणे महापालिकेच्या शाळेची दुरवस्था मनसे कडून उघड

## मनसे दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील यांचे महापालिकेला निवेदन




▶ एस. के.

***दिवा:–वर्ग खोल्यांची दुरवस्था आणि फुटलेला फळा अशा वातावरणात दिवा शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांची लहान मुलं आपलं प्राथमिक शिक्षण घेत आहेत. एकीकडे स्मार्ट सिटीच्या गमाज्या मारणाऱ्या ठाणे महापालिका प्रशासनाने या शाळांची दयनीय अवस्था एकदा येऊन पहावी असा संताप व्यक्त करत दिवा मनसेचे अध्यक्ष तुषार पाटील यांनी दिवा पश्चिमेकडील महापालिका शाळेच्या दुरावस्थेबाबत प्रशासनाला जाब विचारला आहे.***

दिवा पश्चिमेकडील ठामपा शाळा क्रमांक ७९/९८ मध्ये विद्यार्थी आणि शिक्षक वर्गाला मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या शाळेतील प्रसाधन गृहांची स्थिती दयनीय असून विद्यार्थ्यांना याचा त्रास सहन करावा लागतोय. प्रसाधन गृहातील मलनिस्सारण व्यवस्था सुस्थितीत नाही. याचा परिणाम संपूर्ण शाळेत दुर्गंधी येण्यास होत आहे.मोठ्या प्रमाणात असणारी अस्वच्छता आरोग्याला घातक ठरू शकते असे तुषार पाटील यांनी पालिकेला दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

शाळेतील खिडक्यांच्या काचा फुटलेल्या आहेत. या फुटलेल्या काचांमुळे भविष्यात एखादा अपघात घडू शकतो अशी भीती तुषार पाटील यांनी व्यक्त केली आहे.शाळेकडून याबाबतीत प्रभाग समितीला पत्रव्यवहार करण्यात आला होता मात्र अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या शाळेची पटसंख्या ही चांगली असून, इथल्या शिक्षकांनी मुलांसाठी घेतलेल्या मेहनातीमुळे शाळेने राष्ट्रीय आणि महापालिका स्तरावर पारितोषिकेही जिंकलेली आहेत असे तुषार पाटील यांनी पालिकेला पत्रातून लक्षात आणून दिले.

# श्रीमान शिंदे आपण विसरलात का?

## तुम्ही निवडून येण्यासाठी उद्धव ठाकरेंची किसन नगरमध्ये विशेष सभा घेतलीत, हे ठाकरेंचे कर्तृत्व!



## ठाकरेंचे कर्तृत्व विचारणाऱ्या शिंदेंना उपजिल्हाप्रमुख घाडीगांवकर यांचा टोला

**ठाणे:**–मुख्यमंत्री शिंदे विचारतात उद्धव ठाकरेंचं कर्तृत्व काय?महाराष्ट्राचे सीएम इतके विसरभोळे असतील असं वाटलं नव्हतं २०१९ साली स्वतः निवडून येण्यासाठी उद्धव साहेबांची सभा किसन नगर मध्ये घेणारे एकनाथ शिंदे हे उद्धव साहेबांना त्यांचं कर्तृत्व विचारतात हा मोठा विनोद आहे असा टोला ठाकरेंच्या शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगांवकर यांनी लगावला आहे.

उद्धव ठाकरे यांच्या ठाण्यातील पत्रकार परिषदेवर उत्तर देताना एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंचं कर्तृत्व काय असा सवाल केला होता. त्याला उत्तर देताना ठाकरेंच्या शिवसेनेचे ठाणे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी एकनाथ शिंदे यांच्या वक्तव्याचा चांगला समाचार घेतला आहे. २०१९ साली एकनाथ शिंदे यांनी निवडून येण्यासाठी उद्धव ठाकरेंची किसन नगर मध्ये विशेष सभा घेतली होती. स्वतःला निवडून येण्यासाठी उद्धव ठाकरेंची सभा घेता आणि उद्धव साहेबांचे कर्तृत्व विचारता? असा टोलाच संजय घाडीगावकर यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला आहे. २०१४ साली भाजपसोबत नसतानाही ६३ आमदार उद्धव ठाकरे यांनी निवडून आणले हे उद्धव ठाकरेंचे कर्तृत्व आहे. बाळासाहेबांनंतर शिवसेना पक्ष भाजप करत असलेल्या अंतर्गत विरोधानंतर सक्षमपणे चालवून निवडणूक जिंकणे हे उद्धव ठाकरे यांचे कर्तृत्व आहे. तुम्ही गद्दारी केली नसती तर शिवसेना क्रमांक एकचा पक्ष झाला असता असेही संजय घाडीगावकर यांनी शिंदेंना सुनावले आहे.

## गांवदेवी पालखी सोहळा व जत्रोत्सव उत्साहात संपन्न



**दिवा:–** दिवा गावातील आई गांवदेवीचा पालखी सोहळा व यात्रा मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली.यावेळी दिवा गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिव्यातील शैलेश मनोहर पाटील, गणेश भगत, अमर ब्रम्हा पाटील, विनोद भगत, आदेश भगत, सुमित सुभाष भोईर, उमेश भगत, चेतन पाटील, अमित म्हात्रे यांच्यासह गावातील ग्रामस्थ,महिला मोठ्या संख्येने पालखी सोहळ्यात उपस्थित होते.

## मामाच्या गावाला नेण्यासाठी 'लालपरी' सज्ज

**ठाणे :** उन्हाळ्याच्या सुट्टयाला लागल्या रे लागल्या तर बच्चेकंपनी आपल्या मामाच्या गावी जाण्यासाठी हट्ट करतात, त्यांना गावी तसेच फिरण्यासाठी जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी लालपरी सज्ज झाला आहे. येत्या १० एप्रिल पासून ते १५ जूनपर्यंत या कालावधीत उन्हाळी ४९ जादा बसेस सोडण्याचा निर्णय ठाणे एसटी विभागाने घेतला आहे. त्यानुसार उन्हाळी सुट्ट्यांच्या कालवधीत ठाणे १ आणि ठाणे २ या आगारसह कल्याण, विठ्ठलवाडी, मुरबाड, शहापूर आणि वाडा या सात एसटी अगगारातून नियमित गाड्यांव्यतिरिक्त वरील गाड्यांचे नियोजन केले आहे. या सोडण्यात येणाऱ्या जादा बसेसमध्ये देखील सवलतींचा लाभ देखील प्रवाशांना मिळणार असल्याची माहिती एसटी विभागाकडून देण्यात आली.

गणेशोत्सवात आणि दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये ठाणे विभागाचे भारमानात वाढ होण्याबरोबरच उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर देखील जादा बसेसचे नियोजन केले होते. त्यानुसार राज्यातील विविध भागात जाण्यासाठी विशेष करून पश्चिम महाराष्ट्र, खान्देश आणि मराठवाड्यात जाणाऱ्या नागरिकांसाठी एसटीच्या ठाणे विभागाने चांगली कंबर कसली होती. त्यानंतर आता, उन्हाळ्याच्या



सुट्ट्यांमध्ये गावाकडे अथवा पर्यटन क्षेत्राकडे जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी कंबर कसली आहे. ठाणे १ आणि ठाणे २ या आगारसह कल्याण, विठ्ठलवाडी, मुरबाड, शहापूर आणि वाडा या सात एसटी अगगारातून नियमित गाड्यांव्यतिरिक्त ४९ गाड्यांवर नियोजन केले आहे.

## ठाणे जिल्ह्यातील धान्य उत्पादक शेतकऱ्यांना दहा कोटींचा बोनस

### जिल्हा पणन महामंडळाकडून २ लाख १९३ क्विंटल धान्याची खरेदी

**ठाणे :** ई पीक अँपवर पीक पेऱ्याची नोंद केलेल्या जिल्ह्यातील ६ हजार ४३५ धान्य उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर १० कोटी २९ लाख ६ हजार १९५ रुपये एवढा बोनस जमा करण्यात आला असून उर्वरित शेतकऱ्यांना लवकरच बोनसची रक्कम बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून राज्य शासनाने हेक्टरी १५ हजार रुपये बोनस देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार प्रति शेतकरी दोन हेक्टरपर्यंत ही बोनसची रक्कम देण्यात येणार होती. त्यासाठी ई पीक अँपवर पिक पेऱ्याची नोंदणी केलेले जिल्ह्यातील ७ हजार ३१९ शेतकरी बोनससाठी पात्र ठरले होते. जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी सुमारे ११ कोटी ४९ लाख ७६ हजार ०५० रुपये एवढी बोनसची रक्कम जिल्हा पणन महामंडळाकडे जमा झाली आहे. त्यापैकी आतापर्यंत ६ हजार ४३५ शेतकऱ्यांना १० कोटी २९ लाख ६ हजार १९५ रुपये एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. यासाठी ई पिक अँपवर पिक पेऱ्याची नोंदणी करणे अनिवार्य होते. पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जिल्हा पणन महासंघाच्या माध्यमातून ही रक्कम जमा करण्यात आली.

खरीप हंगामात जिल्हा पणन महासंघाच्या धान खरेदी केंद्रावर धान्याची ची विक्री करणाऱ्या ६ हजार २८९ शेतकऱ्यांपैकी ४ हजार ४७५ शेतकऱ्यांना धान्याची रक्कम अदा करण्यात आली आहे. आधारभूत किंमत धान्य खरेदी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य पणन महामंडळाच्या माध्यमातून जिल्ह्यातील ५ संस्थांच्या माध्यमातून धानाची खरेदी करण्यात येते. या संस्थांच्या माध्यमातून आतापर्यंत २ लाख १९३.३९ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे. त्यातील ४ हजार २८६ शेतकऱ्यांना आतापर्यंत २७ कोटी ३८ लाख ६९ हजार ७९६ रुपये एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांना धान खरेदीची रक्कम तसेच प्रोत्साहनपर बोनसची रक्कम लवकरच बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहे.

# दातिवली येथे हनुमान जयंती उत्साहात साजरी



**दिवा–** दातिवली येथे हनुमान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला.

हनुमान जयंतीनिमित्त येणाऱ्या भक्तांसाठी महाप्रसाद व भंडारा ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ४. ते ५ वा.

सामुदायिक काकड आरतीने झाली.

त्याच बरोबर हरिपाठ प्रवचन वैष्णवी महाराज म्हात्रे दातिवली, सामुदायिक हरिपाठ मंडळ (दातिवली), संगीत भजन श्री. विठ्ठल रुक्माई महिला भजन मंडळ.दातिवली इत्यादी कार्यक्रम पार पडले. यावेळी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. याप्रसंगी व्यवस्थापक, ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.




# संघर्ष कोकण रेल्वे संघटना व शिवशक्ती रिक्षा युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली रेल्वे अधिकाऱ्यांची भेट!

**दिवा:**–संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटना दिवा व शिव शक्ती शिक्षा युनियन दिवा यांच्या पदाधिकाऱ्यांनी दिवा पूर्वेकडील रेल्वे फाटक व आसपासच्या परिसरात होणारी प्रवाश्यांची गर्दी व ट्रॉफीक जॅम यावर मार्ग काढण्यासाठी रेल्वे अधिका–यांशी चर्चा केली.

'संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटना 'दिवा. अध्यक्ष विजय भोईर व शिव शक्ती रिक्षा युनियन दिवा अध्यक्ष विनोद भगत यांनी रेल्वे अधिकारी श्री पैठणकर यांच्या समवेत दिवा पुर्वेकडील तलाव व आर वो बी साठी जे कॉलम उभे केले अहेय त्या मधून असणाऱ्या जागेतून रस्त्याचे काम केल्यास साबे गांवाकडे जाणाच्या वाहनासाठी ट्रॅफिक जॅम व रेल्वे प्रवासांची होणारी गर्दीच्या समस्येचे निवारण होईल अशी आग्रही मागणी केली.

# ठाण्याचा पारा ४१.३ अंश सेल्सिअसवर

ठाणे: ठाण्यात गेल्या तीन दिवसात राजकीय वातावरण चांगलेच तापले असताना, या दिवसात दुसरीकडे तापमानाने चांगली उसळी घेतली आहे. गुरुवारी ठाणे शहरातील तापमानाचा पारा हा ४१.३ अंशावर पोहोचला. २४ फेब्रुवारीनंतर गुरुवारी तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या आरपार गेल्याचे पाहण्यास मिळाले. यामुळे ठाणेकर नागरिकांच्या अंगातुन घामाच्या धारा वाहत होत्या.

गतवर्षी म्हणजे २०२२ मध्ये होळीच्या दुसऱ्याच १७ ( मार्चला ) दिवशी ठाणे शहराचे तापमान ४५.६ अंश सेल्सिअसने वधारला होता. त्यातच हवामान विभागाने मुंबई, रायगड, पालघरसह ठाणे जिल्ह्यातही १४ ते १६ मार्च २०२२ या कालावधीत उष्णतेच्या लाटांचा अंदाज वर्तविला होता. त्यानुसार ठाण्याचा पारा ३५ अंशाच्या पुढे जाऊ लागला. तो आकडा आता जवळपास ४० अंशाच्या आसपास किंवा त्याच्याही पुढे जाताना वारंवार दिसून आला होता

यंदा मात्र, फेब्रुवारी २०२३ च्या १९ आणि २३ या कालावधीत उष्णतेच्या लाटांचा अंदाज वर्तविला होता. त्या कालावधीत तापमानाचा पारा १९ फेब्रुवारीला ४१.९ अंश सेल्सिअसवर गेले होते. त्यानंतर २३ फेब्रुवारीला पुन्हा तापमानाचा पारा हा ४१.८ अंशावर गेला होता. त्यातच पुन्हा एकदा शुक्रवारी २४ फेब्रुवारीपासून पुढे चार दिवस हवामान विभागाने उष्णतेच्या लाटांचा अंदाज वर्तवला असताना, पहिल्याच दिवशी म्हणजे २४ फेब्रुवारीला तापमानाचा पारा ४२.२ अंश सेल्सिअस इतका नोंदवला गेला आहे. उर्वरित दिवसात आणि आगामी होळीनंतर हे तापमान वाढण्याची शक्यता होती. मात्र त्याचवेळी अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्याच्यानंतर ही ठाण्यात अवकाळी पाऊस झाल्याने वातावरणात गारवा पसरला होता. याचदरम्यान मेघ दाटून येत येत असल्याने तापमानही ३५ अंशाच्या आसपास होते.

# चिखलाने रोखला मुंबई-नाशिक महामार्ग ; ४० मिनिटे वाहतुक कोंडी

**ठाणे: पुन्हा एकदा रस्त्यावर पडलेल्या चिखलाने ठाणे शहरातून जाणारा मुंबई नाशिक महामार्ग रोखून धरला होता. शनिवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास कॅडबरी ब्रिज जवळ, विवियाना मॉलच्या समोर, मुंबईकडून नाशिककडे जाणाऱ्या रोडवरती अनोळखी डंपरमधून चिखल पडल्यामुळे त्या रस्त्यावर सुमारे ४० मिनिट वाहतूक कोंडी झाली होती. त्याच्यावर वेळीच पाण्याचा मार केल्यानंतर तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला.**



वाहतुक शाखेचे पोलीस हवालदार ए एस साबळे यांनी भ्रमण ध्वनीवरून आपत्ती व्यवस्थापन कक्षाला मुंबई-नाशिक रोडवरील विवियाना मॉलच्या समोर मुंबईकडून नाशिककडे जाणाऱ्या रोडवरती एका अनोळखी डंपरमधून चिखल पडले आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाल्याचे सांगितले. ही माहिती मिळताच घटनास्थळी वाहतूक पोलीस कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान ०१-फायर वाहनासह व ०१-रेस्क्यू वाहनासह दाखल झाले. चिखलावरून वाहन घसरण्याची शक्यता अधिक असल्याने त्या रस्त्यावरील वाहतूक थांबविण्यात आल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. मात्र याचदरम्यान सुदैवाने तोपर्यंत कोणालाही दुखापत झालेली नाही. त्यानंतर तातडीने मुंबई-नाशिक रोडवरती पडलेल्या चिखलावर आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांचे मदतीने पाणी मारून बाजूला करण्याचे काम सुरू झाले. चिखल पूर्णपणे बाजूला केल्यानंतर तो रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आणि वाहतूक पुर्वरत होण्यास सुरू झाली अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्वक व्हावीत यासाठी ठामपाच्या अभियंत्यांना आयआयटीमार्फत मार्गदर्शन

**ठाणे :** ठाणे महापालिका हद्दीमध्ये सुरू असलेल्या रस्त्याच्या कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्यासाठी ठाणे महापालिकेने आय. आय.टी. मुंबई यांची नेमणूक केली आहे. रस्त्यांची कामे करताना रस्त्यांच्या कामाचे गुणवत्ता मुल्यांकन, गुणवत्ता नियंत्रण, कामे करावयाची पध्दत व तांत्रिक बाबींबाबतचे मार्गदर्शन ठाणे महानगरपालिकेचे अभियंते, ठेकेदार यांना नुकतेच आय.आय.टी. मुंबईच्या तज्ज्ञामार्फत करण्यात आले.



ठाणे महानगरपालिकेच्या अर्बन रिसर्च सेंटर येथे मंगळवारी या मार्गदर्शन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. आय.आय.टी. मुंबईचे उपसंचालक प्रा. के.व्ही. क्रिष्णा राव, सहयोगी प्रा. पी. वेदागीरी, प्रा. सोलोमन देबार्मा यांनी ठाणे महापालिकेच्या अभियंत्यांना व ठेकेदारांना मार्गदर्शन केले. यावेळी ठाणे महापालिकेचे नगरअभियंता प्रशांत सोनग्रा यांनी आय. आय.टी.च्या प्राध्यापकांचे स्वागत केले.

ठाणे महानगरपालिकेने हाती घेतलेल्या टप्पा १ मध्ये २१४ कोटी व टप्पा २ मध्ये ३९१ कोटीची रस्त्यांची कामे सुरू आहेत. या सर्व रस्त्यांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणेसाठी आयआयटी मुंबई यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच रस्त्यांच्या कामांमध्ये प्रामुख्याने डांबरीकरण, मास्टीक,युटीडब्ल्युटी व सिमेंट काँक्रिटीकरण पध्दतीने रस्ते तयार करण्याचे काम प्रस्तावित आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेतील अभियंते व ठेकेदारांसाठी या मार्गदर्शन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. रस्त्याची कामे करताना त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा कसा ओळखावा, कामाचे गुणवत्ता मुल्यांकन, गुणवत्ता नियंत्रण तसेच कशा करण्याची योग्य पध्दत, रस्त्यांसाठी करावयाच्या चाचण्या, वातावरण व तापमान यांचा होणारा परिणाम, काम गुणवत्तापूर्वक होण्यासाठी करावयाच्या इतर बाबी, तांत्रिक बाबींचे विश्लेषण व इतर अनुषंगिक बाबींबाबतचे मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण वर्गास ठाणे महानगरपालिकेचे जवळपास १०० अभियंते, २० ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी होते. रस्त्यांच्या कामांबाबत मार्गदर्शन केल्याबद्दल आयआयटीच्या प्राध्यापकांचे व उपस्थितांचे उपनगरअभियंता रामदास शिंदे यांनी आभार व्यक्त केले.


## ६ हजार पीडी मिटर थकबाकीदारांना टोरंट पॉवरने धाडली दुसरी नोटीस

**ठाणे:** कळवा-मुंब्रा-दिवा येथील वीज ग्राहकांमध्ये ज्यांची महावितरण पीडी मिटर (झऊ शींशी) वीज बिलाची थकबाकी शिल्लक असूनही त्याचा भरणा केला नाही, अश्या सुमारे सहा हजार ग्राहकाना थकबाकीबाबत दुसरी नोटीस टोरंट पॉवर कंपनीने जारी केली आहे.

ज्या ग्राहकांचे मीटर पीडी ( कायमस्वरूपी बंद) झाले असतील किंवा त्या बिलाबाबत- थकबाकीबाबत काही शंका, वाद असेल तर अश्या ग्राहकानी कल्याण-शीळ रस्त्यावरील अरिहंत बिल्डींगमधील टोरंट पॉवरच्या कार्यालयात सोमवार-मंगळवारी संपर्क साधावा. महावितरणचे अधिकारी खास पीडी मिटर थकबाकी बाबत अरिहंत कार्यालयात सोमवार व मंगळवारी सकाळी ११ ते दुपारी २ वेळेत उपस्थित राहून ग्राहकाना भेटणार आहेत. ग्राहकांनी त्यांची कागदपत्रे घेऊन सदर अधिकारयाना भेटून त्यांच्या तक्रारीचे निरसन करून घ्यावे असे आवाहन टोरंट पॉवर कंपनीने केले आहे

कळवा-मुंब्रा-शीळ दिवा क्षेत्रात तीन लाखावर वीज ग्राहक असून वीज मीटर असलेले ९० टक्केहून अधिक ग्राहक नियमित वीज बिलाचा भरणा करीत आहेत. त्यात सहा हजारावर पीडी मीटर थकबाकीदार असे आहेत की, ज्यांच्याकडे मीटर नाही व त्यानी अनेक महिन्यांपासून थकीत वीज बिलाचा भरणा केलेला नाही. अश्या ग्राहकानी ग्राहक कक्षाशी संपर्क साधून पीडीची थकबाकी भरणे व मीटर जोडणी कायदेशीररित्या करून घ्यावी असे आवाहन टोरंट पॉवर कंपनीने केले आहे. सध्या थकबाकी न भरलेल्या ग्राहकाना कंपनीने दुसरी नोटीस पाठवली असून तीन महिन्यात तीन नोटीस दिल्यानंतरही ग्राहकानी प्रतिसाद दिला नाही, तर त्यांच्यावर वीज कायदा अधिनियमनुसार कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. ग्राहकानी तिसर्या नोटीसची वाट न पाहता ग्राहक कक्षाशी लवकरात लवकर संपर्क साधून नवीन मीटरसाठी अर्ज करावा असे आवाहन टोरंट पॉवर कंपनीने केले आहे.

## 'कोविड मृत्यू टाळणे हे आपले प्रथम कर्तव्य'-आयुक्त



### नागरी आरोग्य केंद्र तसेच कळवा रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची कोरोना चाचणी करण्याचे आदेश

**ठाणे :** कोरोनाविरोधी लढ्यात आपण थोडेही गाफील राहून चालणार नाही. नागरिक, खाजगी डॉक्टर या सगळ्यांना त्यांचे गांभीर्य पटवून देण्यात महापालिकेच्या आरोग्य केंद्राची आणि तेथील वैद्यकिय अधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची आहे. चांगली रुग्ण सेवा देणे आणि शक्य असलेला प्रत्येक कोविड मृत्यू टाळणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. त्यात अजिबात हयगय होऊ नये, अशी सूचना महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केली आहे.

याचदरम्यान नागरी आरोग्य केंद्र तसेच छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची कोरोना चाचणी करा, तसेच सध्याच्या आकडेवारीनुसार, आनंदनगर, कळवा, गांधीनगर या भागात रुग्ण संख्या अधिक दिसते आहे. असेही आयुक्तांनी सांगितले.

कोरोनाची रुग्ण संख्या वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयुक्त बांगर यांनी महापालिकेच्या सर्व वैद्यकिय आरोग्य अधिकाऱ्यांची बुधवारी बैठक घेतली. त्यात, सध्याची परिस्थिती हाताळण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच, रुग्ण संख्या वाढली तरत्याचे नियोजन कसे करावे याबद्दल दिशादर्शन करण्यात आले. स्थानिक पातळीवरील अडचणी,कर्मचारी उपलब्धता आदींबाबत काही अडचणीही यावेळी आयुक्त श्री. बांगर यांनी समजून घेतल्या.

या बैठकीस, सर्व वैद्यकिय आरोग्य अधिकाऱ्यांसह, उपायुक्त मनीष जोशी, उप वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता हमरजकर, डॉ. प्रसाद पाटील, डॉ. दीपा भंजन आणि डॉ. मनीष उबाळे उपस्थित होते. नागरी आरोग्य केंद्र तसेच छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची कोरोना चाचणी करण्याचे आदेश आयुक्त बांगर यांनी या बैठकीत दिले. चाचणीचे प्रमाण वाढल्याने आपल्याला कोरोनाच्या प्रसाराचा अंदाज येईल. त्यानुसार, आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवता येईल, असेही आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले. सध्याच्या आकडेवारीनुसार, आनंदनगर, कळवा, गांधीनगरया भागात रुग्ण संख्या अधिक दिसते आहे. अशा भागात जास्त सतर्क राहावे लागेल,असे आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या नियोजनाचे सर्वाधिकार हे वैद्यकिय आरोग्य अधिकाऱ्यांकडे आहेत. कोविडसाठी जादा कर्मचारी घेऊन त्यांना बसवून ठेवू नये. त्यांच्याकडून गुणवत्तापूर्ण काम करून घ्यावे. आवश्यकतेनुसार आपण ऑनलाइन मीटिंगच्या माध्यमातून संपर्कात राहू. कोरोनाच्या काळात कोणत्याही प्रकारची हलगर्जी होणार नाही, याची दक्षता सगळ्यांनी घ्यावी. हलगर्जी निदर्शनास आली तर नोटीस, खुलासा याची वाट न पाहता कारवाई केली जाईल, असा इशारा आयुक्त बांगर यांनी दिला.

चाचणी करण्याऱ्या टीमची जबाबदारी निश्चित केलेलीअसावी. चाचणी कोणी केली, नोंद कोणी केली,त्याचा फॉलोअप काय घेतला याची सगळी माहिती संबंधितांनी वेळोवेळी घ्यावी. त्याचबरोबर, नागरिक, रुग्ण आणि खाजगी डॉक्टर या सगळ्यांशी बोलताना आपण सौजन्याने वागावे. तसेच, कोरोनाबाधित रुग्ण हे रुग्णवाहिकेतून रुग्णालयात जातील, याची दक्षता घेतली जावी, असेही आयुक्त बांगर यांनी सांगितले.

# पुढील दोन महिन्यात कामे पूर्ण करा नाहीतर कारवाईला सामोरे जा

## सीईओ यांचे आदेश वजा इशारा



**ठाणे:** येत्या २ महिन्यात जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, अपूर्ण घरकुल पुर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहून काम करा. तसेच दोन महिन्यांत दिलेली कामे पुर्ण झाली नाहीतर कारवाई करण्यात येईल असे आदेश वजा इशारा ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश दिले. तसेच मोखावणे येथिल ग्रामविकास अधिकारी दिनेश पाकळे यांनी समन्वय साधून प्रयत्नपूर्वक खाजगी जागेत १२ घरासाठी जमीन उपलब्ध करून दिली आहे. दिनेश यांचे कौतुक करुन त्यांच्याकडून आदर्श घेत कामे उत्तमरित्या पार पाडावीत असेही त्यांनी सांगितले.

शहापूर शेतकरी भवन, पंचायत समिती येथे आढावा बैठक बोलविण्यात आली होती. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मनुज जिंदल यांच्या उपस्थितीत विविध योजनांची सध्यस्थिती व कार्य पद्धती बाबत चर्चा करण्यात आली. याचदरम्यान त्यांनी जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, प्रधान मंत्री आवास योजना, जनसुविधा, नागरी सुविधा, कर वसुली, पंधरावा वित्त आयोग संदर्भात आढावा घेतली. त्यावेळी त्यांनी वरील आदेश दिले आहेत. त्या कामातील गती वाढविण्यासाठी आढावा बैठक महत्त्वाची ठरली.

तर खर्डी ग्रामपंचायत येथील जल जीवन मिशन योजनेच्या कामाची पाहणी करण्यात आली तसेच काम जलदगतीने करण्यासाठी मार्गदर्शन केले. खर्डी ग्रामपंचायत अंतर्गत १५ भूमिहीन लाभार्थ्यांना जागा वाटपाची सनद त्यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग अर्जून गोळे, गट विकास अधिकारी पंचायत समिती शहापूर भास्कर रेंगडे तसेच सर्व पंचायत समितीचे विभाग प्रमुख, शाखा अभियंता, विस्तार अधिकारी, कर्मचारी व ग्रामसेवक उपस्थित होते.

# प्लॅस्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी भिवंडी, अंबरनाथ, शहापूर येथे प्रकल्प




## जिल्हा परिषदेचा ग्रामीण भागासाठी पुढाकार

*__ठाणे:__ दिवसेंदिवस प्लॅस्टिक वापर वाढत आहे. शहरी भागात तसेच ग्रामीण भागात देखील प्लॅस्टिक वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. प्लॅस्टिक व्यवस्थापन आव्हान म्हणून समोर उभे राहिले असताना ठाणे जिल्हा परिषद अंतर्गत प्लास्टिक व्यवस्थापन करण्यासाठी पुढाकार घेऊन कामास सुरुवात केली आहे. गावातील रस्त्याच्या कडेला व महामार्गावर प्लॅस्टिक सारख्या घातक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी भिवंडी, अंबरनाथ, शहापूर येथे प्रकल्प लवकरच सुरू करण्यात येणार आहे.*

*प्लॅस्टिक पुणर्वापर औद्योगिक क्षेत्रात महत्त्वचे योगदान ठरत आहे. औद्योगिक क्षेत्रात इंधनाच्या स्वरूपात प्लॅस्टिक वापरले जाणारे आहे. तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत प्लास्टिक पासून रस्ता तयार करण्यात येणार आहे. भिवंडी तालुक्यातील काल्हेर येथे दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी एक मेट्रिक टन प्लॅस्टिक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बायोटेक कंपनी पुढाकार घेत आहे. ठाणे जिल्ह्यातील महानगर पालिका ज्या पद्धतीने शहरी भागातील कचऱ्याचे व्यवस्थापन करते तसे ग्रामीण पातळीवर व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा परिषदेला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. गाव पातळीवर निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी काल्हेर येथे प्लॅस्टिक व्यवस्थापन केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. १५ वित्त आयोगाच्या माध्यमातून २८ ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात प्रत्येकी दीड कोटीचा प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प सुरू होणार आहे अशी माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग प्रमुख यांनी दिली.*

*जागेसाठी पहिल्या टप्प्यात ग्रामपंचायत पातळीवर ८० लाख रुपये निधीतून जागेची हमी घेणे, ५०*



*काचरा वेचक महिलांचे पथक नेमणे व त्यांच्या मार्फत कचरा गोळा करून विघटन करणे, साप करुन, वाळवून, मशीन द्वारे बारीक तुकडे करून प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात येणार आहे. जिल्हा परिषद तर्फे पहिल्यांदा प्लॅस्टिक व्यवस्थापनेसाठी महत्त्वाची पावले उचलली जात आहेत.*

# ठाण्यात होणार काँग्रेसची पहिल्यांदा विस्तारीत कार्यकारणीची बैठक

**ठाणे :** काँग्रेसची ठाण्यात गेलेली पत परत मिळविण्यासाठी काँग्रेसने पुन्हा हालचाली सुरु केल्या आहेत. ठाकरे गट आणि राष्ट्रवादी यात पुढे निघाली आहे. त्यामुळे काँग्रेस मागे कशी राहिली. त्यांनी देखील आता ठाण्याकडे पुन्हा लक्ष केंद्रीत केले आहे. त्यानुसार आता ठाण्यात पहिल्यांदाच राज्यातील दिग्गज नेत्यांची फळी ठाण्यात अवतरनार आहे. यामध्ये माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण आदी मंडळींचा समावेश आहे. तर येत्या १० एप्रिल रोजी ठाण्यात विस्तारीत कार्यकारणीची बैठक आयोजित केल्याची माहिती काँग्रेस शहराध्यक्ष ॲड.विक्रांत चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली

काँग्रेसच्या वतीने 'जय भारत सत्याग्रह' हा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या विस्तारीत कार्यकारणीची बैठक प्रदेश प्रभारी एच.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात,माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण तसेच प्रदेश कार्याध्यक्ष,सहप्रभारी आदींसह इतर दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत. येत्या १० एप्रिल रोजी ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन येथे सकाळी ११ वाजता ही बैठक संपन्न होणार आहे. या बैठकीत नवीन कार्यकारणीची घोषणा होण्याची शक्यता आहे. तसेच काही ठरावही केले जाणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.तसेच या निमित्ताने जय भारत यात्रेचा शुभांरभ केला जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविला जाणार असून याचवेळी सत्याग्रह आणि स्वातंत्रवीरांची रॅली देखील काढली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यातून गटबाजीला तिलांजली दिली जाणार असून मतदारापर्यंत पोहोचण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेत मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे,प्रवक्ते राहुल पिंगळे,बाळासाहेब भुजबळ,प्रदेश सदस्य रमेश इंदिसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

एकूणच मागील काही महिन्यापूर्वी झालेल्या सत्तांतरानंतर ठाकरे गट आणि राष्ट्रवादी जनतेची सहानभुती मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे,आणि आता काँग्रेसला पुन्हा नवसंजीवनी देण्यासाठी काँग्रेसने देखील ठाण्याकडे लक्ष केंद्रीत केल्याचे या कार्यक्रमाच्या माध्यमातून दिसत आहे.

# भाजप स्थापना दिनानिमित्त कृष्णा पाटील यांच्या वतीने असंघटित कामगारांना सुरक्षा किटचे वाटप



## आमदार केळकर व आमदार निरंजन डावखरे यांची उपस्थिति

**ठाणे:–** भारतीय जनता पार्टी स्थापना दिवस निमित्त प्रभाग क्रमांक ११ व महाराष्ट्र राज्य असंघटित बांधकाम कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कामगार आणि बांधकाम मजुरांना मोफत सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले.

मागील तीन महिन्यांपासून नोंदणी करण्यात आलेल्या एकूण १००० कामगारांपैकी १०० कामगार आणि बांधकाम मजूर यांना हे मोफत सुरक्षा कीट वाटप करण्याचा कार्यक्रम ६ एप्रिल रोजी पार पडला.

माजी नगरसेवक कृष्णा पाटील यांच्या पाटील हाऊस जरीमरी मंदिर शेजारील गोकुळ नगर येथील कार्यालयात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास प आमदार संजय केळकर,

जिल्हाध्यक्ष आमदार निरंजन डावखरे, सौ. माधवी नाईक , भाजप नेते संदीप लेले,माजी नगरसेवक कृष्णा दादू पाटील,माजी नगरसेविका सौ. नंदा कृष्णा पाटील,ठाणे शहर चिटणीस श्री. सचिन दादू पाटील,असंघटित कामगार संघटना अध्यक्ष श्री. गौतम बर्डे,श्री. केशव पाटील तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, व बांधकाम कामगार उपस्थित होते.

